# पेर्ते व्हा..



१८-४८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
वा. नं. ७३६२
REFBK-0006913
REFBK-0006913

अनिल

# पे तें व्हा . .

आत्माराम रावजी देशपांडे
[ अ नि ल ]

REFBK-0006913
REFBK-0006913

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

★ ५० ★

मूल्य चार रुपये

सर्वाधिकार लेखकाधीन
प्रथमावृत्ति १९४७

मुद्रक : बा. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय,
चिरा बाजार, मुंबई

प्रकाशक : के. भि. ढवळे,
श्री समर्थ-सदन,
गिरगांव, मुंबई ४

चित्रकार : द. ग. गोडसे

गीत


| | |
|---|---|
| उद्या | १ |
| पहिला पाऊस | २ |
| पहाट | ४ |
| झळ | ६ |
| ✓ प्रीतीची रीत | ७ |
| फुलच्चिमणी | ९ |
| झाला अंधार बाहेर | १० |
| हाक | १२ |
| धुंवारी | १३ |
| चित्तचकोर | १५ |
| पावसाळा | १७ |
| घराकडे जातां | १९ |
| तीच बांसरी | २२ |
| शर्वरिणी | २३ |
| गीतप्रवाह | २४ |
| परावृत्ति | २५ |
| प्रीति तुझी माझी | २६ |
| प्रभाततारा | २७ |
| आरास | २८ |
| चिरयौवन | २९ |
| गरीब आणि पावसाळा | ३१ |

एक ३२
तिकडेच सारें कांहीं ३३
शांततेचें पुनरागमन ३४
वाट ३५
दर्शन ३६
वासरूं ३७
श्रीज्ञानेश्वराच्या समाधीपाशीं ३८

## मुक्तछंद

प्रेम आणि जीवन ४०
सुप्त ज्वालामुखी ६६
विशेष ७२
भग्नमूर्तीचें पुनर्दर्शन ७६
काम आणि आराम ७८
मानवता ८४
विजय होतां ८५
धडकी ८७
बंड ९६
पेर्तेव्हा ९८

परिचय, टिपणें १०५

अनुक्रम
क्रं.
नों. दि.
ग्रं. क्र.

# उद्या—!

उद्या ! उद्या तुझ्यामधेंच
फाकणार ना उषा ?
तुझ्यामधेंच संपणार
ना कधीं तरी निशा ?

उद्या, तुझी धरून कास
आज कार्य आखलें
तुझ्यावरी विसंबुनी
कितीक काम टाकलें !

उद्या, तुझ्याचसाठिं आज
आजचें न पाहतों
तुझ्याकडेच लावुनी
सदैव दृष्टि राहतों

उद्या, तुझ्यामधें निवान्त
आजचा अशान्त मी
उद्या ! तुझ्यामुळें जिवंत
आजचा निराश मी !!

## पहिला पाऊस

येत हा पाऊस
येत पाऊस
मातीचा सुटत
सुत्त सुवास

झंझावात वाहे
उठे वादळ
आभाळास मिळे
पृथ्वीची धूळ

मेघांनीं भरून
आकाश वाके
भूमीस आपल्या
छायेंत झाके

अवचित लवे
वीज लाजरी
होतसे मीलन
अश्रूंच्या सरीं

गरजे बरसे
आ सु स ले ला
पहिला पाऊस
उ ल्हा स ले ला

आला हा पाऊस
आला पाऊस
मातीचा भरला
उन्मत्त वास !

## पहाट

आतां काय बोलूं
बोलणें न उरे
अबोलांत सरे
सारें कांहीं
सारें कांहीं
बोलणें बोलून
सांगणें सांगून
मागणें मागून
मागें राही
मागें राही
बरी गेली रात
जरी अंधारांत
हृदीं आठवांत
ठाव होता
ठाव होता
परी पुढें आतां
पहाट फुटतां
नेत्र उघडतां
उजाडलें
उजाडलें

अंधाराचे सरीं
सरावले डोळे
प्रकाशीं आंधळे
झाले आतां
झाले आतां

सोपें होतें वाट
तमांत चालणें
कोठें तरी जाणें
न जाणतां
न जाणतां

परी तेजाळतां
मार्ग हे अनेक
मज माझा एक
सापडेना
सापडेना

दिपले हे नेत्र
प्रकाशाची सृष्टी
पाहण्यास दृष्टी
मागतात
मागतात

# झळ

केळीचे सुकले बाग
असुनियां पाणी
कोमेजलि कवळीं पानं
असुनि निगराणी
केळीचे सुकले बाग

अशि कुठें लागली आग
जळति जसे वारे
कुठें तरी पेटला वणवा
भडके बन सारे
केळीचे सुकले बाग

किति दूरचि लागे झळ
आंतल्या जीवा
गाभ्यांतिल जीवन रस
सुकत ओलावा
केळीचे सुकले बाग

किति जरी घातलें पाणी
सावली केली
केळीचे सुकले प्राण
बघुनि भवतालीं
केळीचे सुकले बाग

## प्रीतीची रीत

अशिच ही प्रीतिची रीत
डोळ्यांत आंसू नि
ओठावरीं हासु
मनींचें मनींच गुपीत
अशीच ही प्रीतिची रीत

हृदयामधें आग
परि गालिं फुलबाग
उसाशांतहि फुलवीत
अशिच ही प्रीतिची रीत

विरहांत बोलणें
भेटींत राहणें
नुसतेंच मुख न्याहळीत
अशिच ही प्रीतिची रीत

मौनांतला अर्थ
शब्दांमधें व्यर्थ
लपवूनही सूचवीत
अशिच ही प्रीतिची रीत

जरि अंतरीं ध्यास
बाहेर परिहास
फसूनी जगा फसवीत
अशिच ही प्रीतिची रीत

# फुलचिमणी

सकाळपासुन शील घालिसी चिमणी तूं नवलाची गऽ
भान हरपवी क्षणिं चित्ताचें गीत तुझ्या हृदयींचें गऽ

दो पंखांचा जीवपसारा इवलासा लोभसवाणा
चिमणी चंचू हलुच सोडिते शीळ घेत मंजुळ ताना
भिरभिर भिरक्या गिरक्या मारित सूर घेत वरतीं खालीं
तरळत फिरसी फुलाफुलांच्या लतातरूंच्या भवतालीं
ह्या पुष्पाहुन त्या पुष्पावर पुष्पपरागा अनुराग
सांगत गुंगत डोलत बोलत डुलवित पुलकित फुलबाग

थांब जरा उकलुं दे साद ही नाद परिचयाचा वाटे
नकळत जागत सुप्त स्मृती मम हुरहुर हृदयामधिं दाटे
हेच सूर, ही तान, गान हें ह्या हृदयांतहि सळसळलें
हीच वृत्ति बेभान, नाहीं पण शब्द तयांतिल आकळले
चित्त तसें उन्मत्त गुंगलें अथांग ती बोलत भाषा
अशीच घालित शीळ राहिलें शब्दांची सोडित आशा

सकाळपासुन शील घालिसी चिमणी तूं नवलाची गऽ
भान हरपवी तसेंच आजहि गीत तुझ्या हृदयींचें गऽ

# झाला अंधार बाहेर

झाला अंधार बाहेर
आतां येई ना घरांत
घरांतल्या दीपाच्या ह्या
मंद प्रकाशांत
आतां येई ना घरांत

संध्याचित्राची सोनेरी
रंगकळा जात जात
क्षितिजाची रेघ मात्र
उरे काळोखांत
आतां येई ना घरांत

आज नाहीं दिसायाच्या
तारा तुला आकाशांत
बघ सर पावसाची
आली क्षणार्धात
आतां येई ना घरांत

कधींची टाकुनी दिली
सतार त्या कोपऱ्यांत
आज घेऊं वाजवाया
हृदय संगीत
आतां येई ना घरांत

बसूं शेजारीं शेजारीं
अभ्यंतरीं आपल्याच
आपल्याच डोळीं पाहूं
चित्रें आपलींच
आतां येई ना घरांत

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम १६८२८
विभाग मराठी
क्रमांक १३५२
नों. दि. २४।१।५४
वाचनालय शाखा

# हाक

दुरुन तुझी हाक मला नित्य ऐकुं ये
सागराच्या त्या अफाटांतुनी
सीमेवरुनी वा क्षितिजाच्या
अवकाशाच्या पलीकडुनी
अंतराळांतुनी अंतरंगाच्या
कुठुन तरी हाक एक पुसट ऐकुं ये

ऐकतांच ती हाक दूरची
चित्त बावरे थरारे अंग
कोठें येऊं मी कां बोलाविसी
कोठुनी मला बाहसी सांग
जिथें न पोचते दिव्याची माझिया प्रभा
दडुन तिथें राहिलास काय तूं उभा

फोडिला दीप फेकून दिला
मिळून गेली ज्योत मातीला
अंधारांतच शोधीत तुला
अंतरांतच भेट ये मला
मिळेन येऊनी तुला कधीं तरी असा
फिरून हाक ऐकुं येत देत भरवसा
हाक तीच स्पष्ट अतां जवळ ऐकुं ये !

# धुंवारी

उदासीन मन
झालें कां ये वेळीं
आणिकांचे मेळीं
सुख न ये

उसळले ढग
आभाळ भरून
आलें अंधारून
जग सारें

कोसळे पाऊस
सरीवर सरी
दाटली धुंवारी
चोहींकडे

तुझा ये आठव
अशा अवसरीं
मूर्ति चित्तांतरीं
उभी राहे

जगांत राहून
जनास पारखा
आठवी सारखा
प्रेम तुझें !

# चित्तचकोर

गगन विहारी चित्तचकोरा
तरलाकारा नादनिर्झरा
मृदु कलरव तव ओतित जासी
गात विहरसी विहरत गासी
शीतल ज्योत्स्ना नीलाकाशीं
पीत विचरसी वरिवरि जासी
वर्षति गगनीं पीयुष धारा
मार भरारी चित्तचकोरा !

हृदय भरोनी उन्मादानें
गासी गीता आर्तस्वरानें
तव गीताच्या नादलहरिनें
मधुर सुकोमल सरस रवानें
कंपविकंपित विरल तरलतर
नादनिनादित सकल चराचर
मृदु रोमांचित प्रमुदित सारें
तव हृदयींच्या प्रीतिनें भरे

प्रीतिभराचा हर्षनिकर तव
नव हृदयींचा व्यक्त करित रव
पूर्त हृदयिंच्या प्रीतिरसाला
व्यक्त कराया गीत कशाला ?

गात मनोगत गीत प्रीतिचें
आर्त रवें कां आर्द्र हृदयिंचें ?
धवल सलिलिं कां वर आकाशीं
गीत प्रवाहीं वाहत जासी ?

वर्षति शशिकर मधुर समयिं या
स्पर्शति मृदुतर समरस हृदया
नव श्रृंगारित मानस रंगें
गीत तरंगीं हृदय तरंगे
येथ नसे का तव प्रीतीला
ठाव अधिकतर ओढ जिवाला ?
उतर उतर तर परत धरणिवरि
झुरत विरहि तव येथ ह्या घरीं !!

बाई या पावसानं
लाविली झीम झीम
भिजलीं हीं माळरानं
उदासलं मन
बाई या पावसानं

दिनभर देई ठाणं
रात्रिस बरसून
सकाळिचं लोपविलं
कोवळं ऊन छान
बाई या पावसानं

फुलली ही जाईजुइ
बहरून वाया जाई
पारिजातकाची बाई
कशी केली दैन
मातींत पखरण

थबथबलेलीं पानं
    ठिबकती वरतून
पाखरांचे भिजवून
    टाकिले पंख छान
    बाई या पावसानं

नदीनाले एक झाले
    पूर भरूनीया चाले
जिवलग कोठें बाई
    पडे अडकून
    नच पडे चैन

बाई या पावसानं
    लाविली झीम झीम

## घराकडे जातां

दिवसाचे सारे
श्रम संपवून
थकून भागून
घराकडे जातां
घराकडे जातां — घराकडे येतां —

वाट ही संपली
घर दिसूं आलें
माझें चित्त खुलें
दुरूनी पाहातां
घराकडे येतां — घरापाशीं येतां —

चिमुकलें घर
फुलें जागोजाग
छोटिशीच बाग
डोळे आनंदांत
घरापाशीं येतां — घराशीं पोचतां —

बाळ लडिवाळ
खेळे अंगणांत
आलाच धावत
कडेखांदीं घेतां
घराशीं पोचतां — घरांत शिरतां—

लागली चाहूल
माझ्या पावलांची
धांदल कुणाची
किती उडे आतां
घरांत शिरतां — घरामधें जातां —

कानीं शब्द येती
‘आलें हं ही आलें’
धावलीं पाऊलें
हसऱ्या स्वागता
घरामधें जातां — घरांत बसतां —

स्वतःच्या हातचा
गोड अल्पाहार
श्र म प रि हा र
बोलतां बोलतां
घरांत बसतां — घरीं विसावतां —

आम्ही दोघेंजण
आमचा हा बाळ
सुखें जाई काळ
हासतां खेळतां
घरीं विसावतां — घरीं आनंदतां —

झाली संध्याकाळ
लागे सांजवात
बाळ म्हणे गीत
बोबड्या शब्दांत
घरीं आनंदतां — घरांत रंगतां —

एखादी कविता
साधें गोड गीत
म्हणूं सुस्वरांत
अंधार पडतां
घरांत रंगतां — ज-ग वि-स-र-तां !

ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र.

# तीच बांसरी

तीच बांसरी त्याच सुरावरि फिरुनि कितिहि जरि वाजविली
तेंच निघे जरि गीत, रिझे नच तळमळ परि हृदयामधली
तोच पवन जरि त्याच उपवनीं वसंतवैभव तें खुललें
तींच फुलें, मन तेंच भुले — परि कांहिंतरी कोठें भुललें !

कांहिंतरी कोठें भुललें—! मन तगमगलें परि नच दिसलें
भासत तें जरि दिसत कुठें तरि आकळितां आधिंच विरलें
त्या उणिवेची जाणिव होउनि तीव्रपणें हृदयांत सले
गूढांतरिं मग कांहिं स्फुरे, मज जें भुललें तें काय कळे !

जें भुललें तें काय कळे—! मग जीव आणखिच होरपळे
जळे जळांतच जीवनाविणें जाणिवमय होई सगळें
भावोन्मय त्या तन्मयतेंतुन चिन्मयतेचा अंश गळे
सहजपणें आनंद खुले मग जें कळलें तें आकळलें !

जें कळलें तें आकळलें मम हृदयाशीं समरस बनलें
तळमळ पाहुनि कळवळलें मज प्रेम तयाचें जाणवलें
भिन्नभिन्न रूपें फुललें तरि एकरूप आंतिल दिसलें
प्रेमपूर्ण सगळें बनलें — जें भुललें तें मजवरि भुललें !!

## शार्वरिणी

उघड उघड उघड दार
प्रियकरास आपल्या
उघड दार...

मध्यरात्रिंच्या नभांत
शांत चांदणें खुलें
पांघरून रश्मिजाल
गाढ झोपलीं फुलें

गाढ झोपलीं फुलें
अजुन हा निजे न भृंग
मरंद गुंगिनें भुलून
मंजु गुंजनांत दंग

अधिर त्या नको सकाळ
त्या दिशाहि उजळल्या
मध्यरात्रिंच्या निळ्यांत
उघड उघड पाकळ्या

उघड उघड उघड दार
प्रियकरास आपल्या
उघड दार...

सारंगीला क्षणभर सख्या ठेव खालीं जराशी
ओतायाचें हृदय किति रे घेउनीयां उराशीं
हा! हा! कोणी मधुरव तुझ्या प्रीतिगीतांतरीचा
दुःखाच्या रे करुण रुदनीं कालवीला कधींचा

सारंगीची पिळुनि किति ही तार तारस्वरांत
हृद्‌भंगाला मधुतर रवें ओतिशी संगमांत
त्या गीताच्या उठति लहरी देह प्रत्यंग हाले
त्यागी त्याच्या इह वसतिला दूर निःसंग चाले

तंतूसंगें तव चपल ह्या अंगुली नाचतात
तारांतूनी स्वर मधुर ते अंतरीं वाजतात
सारंगी ती सहज खुलते ललिता कोमलांगी
गीतार्थातें प्रकटित करी हर्षिता अंतरंगीं

गीतार्थानें हृदय भरलें कंठ कुंठीत झाला
सारंगीच्या समरस अशा अंतरंगांत गेला
निर्जीवाचें सजिव बनलें वाद्य पद्यांत बोले
त्या योगानें तव हृदयिंचा नाद नृत्यांत खेळे

अंतःचक्षूं पुढति विलसे दृश्य त्या नर्तनाचें
त्या नृत्याला हृदय जणुं दे ताल आवर्तनाचे
साऱ्या विश्वीं अनुहत असा नाद व्यापून राहे
वाहे त्याशीं मिळुनि विरण्या जीव गीतप्रवाहें!

# परावृत्ति

येणार खास मी तुझ्याकडे
जरि जीव इथें अडकून पडे
क्षण एक दोन तरि देशील
काढण्यास फसलें पाऊल ?

सारखी ओढ ही तुझ्याकडे
परि म्हणसी कीं मज भूल पडे
देणें न तुला मजसी हात
दुरुनीच मौज बससी पहात !

वर हाससि पाहुन दुबळाई
सारखी आणि करिसी घाई
जा नाहिं अशानें येणार
तूं आल्याविण नच हलणार !

येणारच नाहीं तुझ्याकडे
हो, जीव इथें गुंतून पडे
कां जीव इथें नच गुंतावा ?
येथेंच मला तव हात हवा !

कां तूंहि इथें नच गुंतावें
या जीवनकलहीं झुंजावें ?
छे ! व्यर्थ ओढ ती तुझ्याकडे
जी येथें नच तुजला ओढे ! !

## प्रीति तुझी माझी

प्रीति तुझी माझी ही
प्रीति तुझी माझी न
अवतालीं भंवतालीं
जागतें जीवन !

प्रीति तुझी माझी
प्रीति रम्य फुलबाग
खुलवीत खुलतात
किती महाभाग

प्रीति तुझी माझी
जरी रम्य फुलबाग
जगतीं जीवन आणि
जगतांत जाग !

प्रीति तुझी माझी
प्रीति निराळीच दुनिया
निराळे म्हणोत कोणी
निराळे बनुनिया

प्रीति तुझी माझी
नाहीं निराळेपणाची
जगांतल्या सुखदुःखीं
मिळालेपणाची ! !

विझल्या साऱ्या नभांत तारा
एक तारका परी उरे
हृदयाच्या बंधना भंगुनी
जीव तिच्या भोवतीं फिरे !

तरंग तेजाचे ताऱ्यांच्या
अनंतांत झाले शांत
तेजोवलयें विलय पावलीं
प्रकाशमय अवकाशांत

जीवनांतली निशा संपवित
वाहवीत आशांचा वारा
पसरवीत नव तेज उषेचें
निज तेजासह प्रभात तारा !

# आरास

आज नभीं आरास कशाची ?
लावियले शतदीप चिमुकले
खुललें चिरांगण
विखुरलें नव तेज चहुंकडे
भरलें नभांगण

प्रीतिमहोत्सव कसला चाले ?
निशा – चंद्र मधुमीलन झालें
म्हणुन तयारी ही जलशाची ?
आज नभीं आरास कशाची !

हंसऱ्या पुष्पांची नवशोभा
पसरित मंद सुगंध
हर्ष विकसला जिकडे तिकडे
आनंदी आनंद

आणित जीवन चराचराला
वसंत गगनीं काय बहरला
धवलश्री ही शोभे त्याची ?
छे – अपुल्या प्रीतिच्या यशाची !
आज नभीं आरास कशाची ! !

# चिरयौवन

फिरून वर्षचक्र हें पुढें पुढेंच जातसे
विशी तिशी नि चाळिसीहि लोटली जरी दिसे
असे तरीहि गोठली न जीवनांतली उषा
तशाच रंगसंगतीहि वृत्ति गुंगती तशा

अजून ऊन रक्त हें भरे नसानसांतुनी
तसाच रोमहर्ष आणि अंग ये थरारुनी
विरक्ति ? छे ! सदानुरक्ति ! भक्ति ? प्रेमभक्त मी
तरंग ऊर्मि प्रीतिच्या अजून यौवनांत मी ! !

अजून यौवनांत मी नि दंग जीवनांत या
प्रसादही प्रमादही प्रमोद आणखी दया
विचार आणखी विकार भावनांत पाझरे
मधू न त्यांतला सरे म्हणे न मीहि त्या पुरे

अरे कशास जीवना विचार आणसी मना
उदंड पाज आजची उद्याचि तीहि आणना
पुरें भरावयास पात्र हें नको करूं कमी
तिथें सदा अतृप्त मी अजून यौवनांत मी ! !

अजून यौवनांत मी मुलें फुलें सभोंवतीं
विकासती विलासतो हसून हासवीत तीं
प्रलोभनांत प्रीतिच्या कुणी हसे झुरे जिथें
तिथें सखे नि सोबती कुणी इथें कुणी तिथें

प्रसन्न चित्त हासतें बघूनिया मजेस त्या
मुलांत मूल होत मी फुलांत भृंग होत त्या
भरीत रंग बैठकींत स्नेह सोबतींत मी
प्रियेस प्रेम होत मी अजून यौवनांत मी

अजून यौवनांत मी जगांत जागत्या अशा
जगावयास गावया पहावया उषा निशा
इथें निसर्गचारुता इथें प्रयत्न मानवी
उचंबळोनि वृत्ति ये उमेद घेउनी नवी

विवर्त भ्रांति भास हा अशा जगा म्हणो कुणी
मला इथेंच सत्य तें दिसे पटे क्षणोक्षणीं
विकासलेंच ब्रह्म हें, न जीव बंधनांत मी
नसे मुमुक्षु, मुक्त मी अजून यौवनांत मी !!

## गरीब आणि पावसाळा

इकडे पाणी, तिकडे पाणी, वरखालीं पाणी पाणी
दीनवाणि झोपडी कशीतरि तग धरुनी केविलवाणी
उघडीं पोरें – गोजिरवाणीं – भिरभिर भेदरल्या नयनीं
दारामध्यें उभीं बिलगुनी कुडकुडल्या चिमण्यावाणी
ढोरवासरें अंग चोरुनी खेटुनि वळचणिच्या खालीं
डोळे मिटुनी उभीं तशांतच अंगें झाडित भिजलेलीं
मायलेकरें आंत झोपडिंत तुटलेल्या बाजेवरतीं
माय भिजे, परि बाळ निजे क्षण आईच्या अंकावरतीं
कोपऱ्यांत घरधनी फुंकितो चुलींतलें इंधन ओलें
जाळ होईना इकडे म्हणती भूक भूक पोरेंबाळें
कंटाळुन बाहेर येउनी क्षणभर पाही आभाळ
घोर पडे जीवास कसा करुं रात्रिस यांचा संभाळ
हात जोडुनी आभाळाला गहिंवरुनी मग बोलतसे
" देवा किरपा करा अतांतरि ऊन पडूं द्या थोडेंसें
मागिल वरसा कसा काढला कठिण कोरडा दूकाळ
अंवदा वर पाडता कशाला तसाच हा ओला काळ "

वीज चमकली, निसर्ग हसलें, गडगडाट वर मेघांचा
उपहासाचें हास्य करित ये पाउस पुनरपि जोराचा !

एक असें आहे
एकटेंच नाहीं
गूढ हेंच आहे
गूढताहि नाहीं

कारण सांगाया
न उरे कारण
होतसे दर्शन
न होतां दर्शन

विसर असा कीं
विसर विसरे
पुरें इतुकें कीं
म्हणवे न पुरें

भरला उजेड
नच उजाडता
प्रीती अशी जडे
न जडे जडता !

तिकडेच सारें कांहीं
आज येथें कांहीं नाहीं !
तिकडेच आले ढग
तिकडेच बरसात
तिकडेच सांज खुले
आंत भरल्या रंगांत
वीज तिकडेच लवे
लुकलुके वर तारा
साद पडसाद तेथें
तिकडचा येई वारा
घेई ओढ तिकडची
धडधडून हृदय
घरट्यांतून डोळ्याच्या
दृष्टी उडूनिया जाय
इकडे मी आहें — नाहीं
तिकडेच सारें कांहीं !!

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# शांततेचें पुनरागमन

ये पुन्हा जगांत नांदण्यास शांतता
जपुन हलुच पाऊल
टाकित घे चाहूल
दडलेले भूसुरुंग बघुनि दचकतां !
ये पुन्हा जगांत नांदण्यास शांतता ! !

विजयाचे रागरंग
पाहुनियां अंतरंग
भोवळ येऊनि पडे तोल साधतां !
ये पुन्हा जगांत नांदण्यास शांतता ! !

अपजयांत द्वेषाचा
वन्हि जळत त्वेषाचा
विव्हळून उठत त्यांत अंग भाजतां !
ये पुन्हा जगांत नांदण्यास शांतता ! !

दलितांचें आक्रंदन
ऐकुनियां करित रुदन
आल्यापायींच परत जाऊं लागतां !
ये पुन्हा जगांत नांदण्यास शांतता ! !

परतुनि घे कानोसा
धीर धरुनि थोडासा
दिसलेल्या आशेचा किरण गवसतां !
ये पुन्हा जगांत नांदण्यास शांतता ! !

# वाट

मला आवडते वाट वळणाची
दाट झाडीची नागमोडीची
ही अलिकडची नदिच्या थडिची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
सरघसरणिची पायफसणीची
लवणावरची पानबसणीची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
अशि भुलवणिची हुलकावणिची
सागवेळूच्या भर रानींची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
जरा अडचणिची चढउतरणिची
घाटमाथ्याची ती पलिकडची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
इथची तिथची कधिं कुणिकडची
क्षितिजाकडची पुढची पुढची
मला आवडते वाट वळणाची

## दर्शन

तुझ्या दर्शनाला आज आहे येत
वाजत गाजत असा मिरवीत
उंटावरतीं त्या तर्कांच्या बैसले
नगारची पुढें संशय चालले
कल्लोळांचे सवें ताशे कडाडती
धिक्काराचे ढोल धिम धडाडती
तयांच्या मागुतीं मंजुळ वाजंत्री
वाजवीत जाती भावना अधांत्रीं
लवाजमा चाले ऐटींत पापांचा
ललकार देत आपल्या धन्याचा
साज शृंगाराचे घोडे छबिन्यांत
ठुमकत पाय टाकीत नाचत
वासना भर्जरी अब्दागिरी घेत
थाटांत चालल्या मुजरे करीत
ढाळीत चवऱ्या यशहि ठाकलें
वरती दैवानें छत्रास धरीलें
अहंकार हत्ती डुलत डुलत
घेऊनियां येत मला अंबारींत
अशी ही वरात पातली मंदिरा
तूंच ये सामोरा सोडूनी देव्हारा!

# वासरूं

ओढाळ वासरूं रानीं आलें फिरूं
कळपाचा घेरू सोडूनियां

कानामधें वारें भरूनियां न्यारें
फेर धरी फिरे रानोमाळ

मोकाट मोकाट अफाट अफाट
वाटेल ती वाट धावूं लागे

विसरूनी भान भूक नि तहान
पायांखालीं रान घाली सारें

थकूनियां खूप सरतां हुरूप
आठवे कळप तयालागीं

फिरूं जातां मागें दूर जाऊं लागे
आणखीच भागे भटकत

पडतां अंधारू लागलें हंबरूं
माय ! तूं लेकरूं शोधूं येईं ! !

## श्रीज्ञानेश्वराच्या समाधीपाशीं

थरारून येई रोमांच शरीरीं
झळक इथें ही अशी कांहीं न्यारी
प्रकाशा दिपवी असा हा प्रकाश
समाधिस्थ येथें बैसले ज्ञानेश !

जीवनाचा अंत होऊनियां खालीं
पडे देह तैसा इथें नाहीं खालीं
इथें रोमरोमीं जीव मूर्तिमंत
धरूनी विसांवे चैतन्य अनंत

प्रसादास येथें मिळत प्रसाद
पडसाद ऐके मुळांतली साद
प्रतीतीस होत प्रतीत प्रतीती
आणि स्फूर्तिलागीं येत असे स्फूर्ती

एका जनार्दनीं मिळालें भांडार
ऐकुनियां आला कुणी हा पामर
नसे संत कोणी भाविक ना भक्त
असे जीव मात्र जीवनीं आसक्त

तळमळ कांहीं धरूनियां पोटीं
मिटलेल्या ओठीं रिकाम्याच ताटीं
तयावरतीहि कांहीं कृपा करा
उघडा थोडीसी ताटी ज्ञानेश्वरा!

तुमच्या स्मरणें उचंबळे मन
तुमच्या वाणीचें करीत चिंतन
तुमच्या चरणीं मस्तक ठेविलें
उचलावयाचें भान न राहिलें!!

दोन दिवस उलटून गेले
दोन रात्री तशा संपून गेल्या
अजून परी विषण्णताच मनास खोल व्यापूनि आहे,
हालत्या जलीं साउली जेवीं दूरच्या ढगांची दडूनि राहे

तुम्ही दोघेजण कोण, कोठले?
मैत्री दूरच, नाहीं ओळखही.
ओझरतेंच असें कोठेंतरी
दुरून पाहिलें एकदोनदां
पुसट चित्र कितीतरी तें!
मनांतही माझ्या नाहीं राहिलें!
कशास वाटतें खिन्नता मला
इतुकी बरें?

प्रश्न येई मनीं, तोंच पुढतीं
उभें तें दृश्य! हृदय विदारी
भेसूर किती ... भयंकरच!
भेसुरतेंतही रोमांचकारी!
भयंकरांतच सौंदर्यधारी!

अपमृत्यूच्या काळोखांतही
लहानशाच चांदणीपरी,
विकृत झालेल्या कोंवळ्या मुखीं
हलुवार दिसे मलूल हासूं !

गळ्यांत गळा, हातांचे विळखे
घट्ट बांधलेले, मृत्यूनंतरही
कधीं न सुटो सोबत म्हणूनी ;
त्याच्या वक्षःस्थळीं टेकलें शीर
सानुलें तिचें जणुं म्हणतें
प्रेमाचा पाहा अमर विश्वास !
त्यांतच घेतला शेवटला श्वास ! !

अशीच घेतली हांसत त्यांनीं
शांत त्या जळीं उडी शेवटीं
असेंच काढिलें वर तयांना
जळांतल्या त्या समाधींतूनीं.

दृश्य तें पुढें उभें राहतां कपाळीं हात मारूनि घेतों
आवरतों अश्रू कष्टानें माझे
बाळांनों ! बाळांनों ! बोलूं लागतों
छोटुल्या भावा ! सोनुले ताई !
जगीं जरी नाहीं कांहीं संबंध
जिव्हाळ्यानें पण घडून आला
मुलेंच वाटतां तुम्ही मजला
अथवा भावंडें, कांहींही म्हणा
विश्वप्रेम हें कोणासाठींही
कोणत्या रूपींही एकच आहे !

किती खोलवर लागलें आहे
माझ्या जीवाला तुमचें दुःख
कांहीं जादूनें जरी कळतें
आधीं तुम्हांला माझें हृदय
वडील भाऊ मानून मला
विश्वासानें तरी तुम्ही सांगतां
आपुलीं दुःखें
आणि इतुक्या गोड शब्दांनीं
प्रेमळपणें, तुमचीं मनें समजोनि पूर्ण

विश्वव्यापक सहानुभूतीनें
जीवनाचा मार्ग, उल्हास आशेचा,
आत्मविश्वासाचा, सुनिश्चयाचा,
दाविला असता कळकळीनें
साऱ्या जगाला दिसतें ना मग तुमचें जीवन
प्रेमपरिपूर्ण पूर्णपणांत विराजलेलें ?

आणि आतां पाहा ! प्रेमी जीवांनो !
अज्ञातांत कोठें असाल जरी
कळलें ना तुम्हां ( आणि आम्हांलाही ! )
झालेलें आहे विकृत किती मानवी मन ?
येथें जगतांत कृत्रिम बंध
वंशा–वंशांचे, धर्मा–धर्मांचे,
जाती–जातींचे,
पडून तोडती मानवजाति !
आकुंचित किती स्वभाव झाले
भेदभावहि किती वाढला !
जिवंतपणीं आहेच तो पण
मृत्यूनंतरही तसाच आहे
अशक्य मीलन जित्या जीवीं तुम्हां,

मृत्यूनंतरही वेगळें केलें–!
" शरीरांस द्यावा एकत्र अग्नि
एकाच जागीं किंवा समाधी "
नाहींच पुरती झाली तुमची
शेवटची इच्छा मृत्यूमोलाची !

प्रेमल गड्यांनो ! सख्या सोबत्यांनो !
तुमचें जीवन आम्हांला होतें किती मोलाचें !
छोटीशीच आहे फौज ही बरें
भेद भावांशीं युद्ध कराया,
आणि तुम्ही तर इतुक्यांतच कामाला आलां ?
अखेरपर्यंत धीरानें तुम्ही लढतां जरी
किती इतरांना हुरूप येता !
किती भेदभाव लयाला जाता ! !

हरहर ! कांहीं प्रीतिशाहीर
निराशेचा सूर प्रेमीं भरती
प्रेम–मरणाची गोडी गाऊनी
घालती सांगड ; ( त्यांतलाच मीहि एकदां होतों ! )

प्रेमांत आहेच केव्हां निराशा, केव्हां संकटें
हृद्धंग आणखी विरह–दुःखें
पण प्रेमाची निराशा देखा
त्यांतील दुःखें आणि संकटें
तुच्छ करितील इतर सुखां
इतुकी जादू त्यांच्यांत आहे !
म्हणूनच प्रेम चिरजीवन,
प्रेम विश्वास, प्रेम उत्साह, प्रेम उल्हास,
प्रेम अमृत चिरंतनाचें !
मरणाचा नव्हे मार्ग प्रेमाचा !

गड्यांनो ! नीट समजूनि घ्या !
जरी तुमचीं मनें कोवळीं, लहान वयें
भावनाशील प्रेमी हृदयें
आहांत ना पण तुम्ही शिपाई
शूर दिलाचे, एका दिलाचे ?
पाहा बरें प्रेम काय आहे तें !

प्रेमाचा हेतु ; प्रेम करणें, प्रेमी बनणें,
व्यक्ति प्रेमांतून विश्वप्रेमाची जाणीव घेणें,
प्रेम आहे हें हृदय संस्कार
स्वतःच्याचसाठीं जीवनासाठीं प्रेम करणें

निरपेक्षतेनें प्रेमास देणें
अशा प्रेमालागीं हृद्भंग नाहीं
निराशा नाहीं —
हाच आहे पाया खऱ्या प्रेमाचा !
( जाणतों पण मी मानवी मनें )
प्रेम कराया मूर्ति पाहिजे
प्रेमास अपेक्षा प्रेमाची आहे
प्रेमाची पूर्तता प्रेम मिळणें
ना तरी निराशा, हृद्भंग होणें !

सत्य आहे हें ! आणि विश्वास
दृढ प्रेमावर आहे जयांचा, तयांस खास
प्रेमाची पूर्तता !
धीर धरोनी पाहा प्रत्यय !

जरी अशी प्रेमपूर्ति न झाली
आणि निराशा जीवनीं आली
तरीहि त्यांतच उत्साह, उल्हास
प्रेमी जीवाला, खऱ्या प्रेमाला !

हृदयीं आहेच प्रेमाची मूर्ति
मनोमय तिचें प्रेममंदिर
तिची पूजा अर्चा तिचा संदेश
तेंच ना ध्येय ? कैवल्य ? मुक्ति !

आणि ज्यांची प्रेमपूर्ति होवोनि
प्रेमी हृदया प्रेम मिळालें
भाग्यवंत ते ; त्यांचें जीवन चैतन्य झालें !
प्रेम मिळतां संकटें तीं काय !
त्यांना भिवोनी खावी का हाय ?
जगणें आहेच धर्म सर्वांचा
प्रेमी जनांचें तें कर्तव्य आहे !
कारण प्रेमानें पुढें व्हायाची
प्रगति जगाची, संस्कृतीचीहि
मानवजातीची जगतांतल्या
पटवून देतें प्रेम समता
पूर्णपणाकडे जग नेण्याची
प्रेम एकच चिच्छक्ति आहे
प्रेमांतच आहे कलेंचें बीज !
पटो हें कोणा, वा पटो न तरी

प्रेम जयास साक्षात् मिळे
स्वतांसाठींही, आणखी प्रेम
जिवलगाचें ज्या तयास मिळे,
दोन्ही जीवांसाठीं अवश्य त्याला
जगणें आहे !

आपुलीं घरटीं सोडून दोघे
कंटाळून कोंदाटल्या जीवना
निघालांत जेव्हां मोकळ्या जगीं
एकटें भेटण्या एकमेकांना
आणि भेट होतां एकमेकांची
स्वतंत्रतेच्या खुल्या आकाशीं
खूप भरारी उंच मारूनी
जगतापासून जाऊनी दूर
तेथेंच दोघांनीं सदा राहावें
परत न जगाकडे बघावें
असेंच वाटलें असेल तुम्हां !
अहा ! तीं भरारी मज दिसते
डोळ्यांपुढती चकचकते
काळ्या कुट्ट ढगावरतीं शोभे

जशी भरारी क्रौंच पक्ष्यांची
पहिली भरारी प्रेमी जीवांची
कोणत्याही शब्दीं तिचा आनंद
साठूं न शके !
आनंदें हृदय भरूनि येतें
रोमांचित होतें माझें शरीर !
अजूनही ऐकूं येतें मज जणूं
तुमचें तेथील प्रीतिसंगीत !

हळू हळू पण सांज पडतां,
पंख थकतां
पांखरांनो ! परतलांत खालीं
आणि कोठें तरी वणवणलां
अंधारांतच चांचपडत
उन्मनस्कपणें समाधींतच
जगताचा चुकविण्यास त्रास
जाऊन राहिला कोठें निवाऱ्यास
आणि काय बरें विचार केला ?
चांदण्या रात्रींचे तीन प्रहर
एकामेकापाशीं सदा राहूनी

चंद्र अस्ताला जाण्यापूर्वींच,
असा भयंकर निश्चय केला
उजेडापूर्वींच्या काळोखांतच !

कसा तुमचा हा विचार झाला,
मनांत कोणाच्या सळसळला
कुजबुजला कोण कानांत ?
कल्पनेची एकवटून शक्ति
सारें अनुभव क्षेत्र धुंडाळून
तुमच्या मनांत शिरूं पाहतों
तुमचें हृद्गत जाणूं इच्छितों
पांगळते पण तेथें कल्पना
तर्काचेंच जाळें विणूं लागते !

देहभान हरपलें प्रेमांत
वाटूं लागलें आणि तुम्हांला
अशा आनंद समाधींतच
मृत्यु यावा आम्हां मुक्ति मिळावी ?
प्रेमास आवडे अद्भुतरम्य !

६०१३

जीव वाहतां एकामेकांना
स्वतांच्या जीवाचें भान नुरतें,
उरतें न मोल त्याचें स्वतांला
( पण ज्यालागीं जीव वाहिला
पाहिजे त्यानें तो सांभाळिलाच
जाणून आपल्यावरचा भार
जपलें पाहिजे एकामेकांना ! )

किंवा शोकान्ताच्या प्रेमी जीवांच्या
कथा ज्या वाचिल्या आणि ऐकिल्या
त्यांच्या शोकान्तानें मन भारलें
त्यांनाच आदर्श मानूं लागलां ?
वाटलें त्यांच्यासारखा व्हावा
आपलाही अंत ?
लागून राहावी जगा हळहळ ?
शेवटले क्षण मृत्यूपूर्वीचे
म्हणून दोघांच्या निर्जीव वस्तू
एकमेकांना घट्ट बांधण्यांत
घालविले तुम्हीं ?

एकत्र गुंफुन दोन्हीं शरीरां
आत्महत्येचा विचार केला ?

किंवा चिडलां जगतावरी
निर्बुद्ध, अन्यायी समाजावरी
ज्यानें तुम्हांला अशक्य केलें जगीं मीलन
प्रेमाच्या मार्गांत काटे घातले ?
जीव देऊनी हुतात्म्यापरी
शिकवण त्याला द्यावी सदाची
पटवावें प्रेम किती खरें होतें
आणि करावा कमी त्रासाचा
इतर जीवांचा प्रणय-मार्ग
म्हणून केलें आत्म-समर्पण ?

साजणा ! सांग दिलें होतें ना
तिनें तुला प्रेम जीवाभावाचें
भावसर्वस्व ?
तुझाच आधार, तुझा विश्वास
तूंच कैवल्य, तिला होता ना ?

तुझासाठीं जीव, तुझ्यासाठीं मृत्यु
तुझ्यासाठीं सारें तिला होतें ना ?
केवढी ही शक्ति तिच्या प्रेमाची
तुझ्या हृदयीं खेळत होती !
तुझ्यावर त्या विश्वासल्या जीवा
जीवसर्वस्वें तूंच पाठीशीं
घालून जगाच्या तीव्र विरोधा
तूंच ना तोंड द्यावयाचें होतें ?
प्रेम करतें दुबळ्यांनाही
शूर आणि धीर
तिच्या प्रेमाचा तूं वीर होना ना ?

तूंच तिचा सखा आणि पाठीराखा
तूंच सारें कांहीं तिला होतास
तिच्या प्रेमाचा, तिच्या जीवाचा
भार तूं शिरीं घेतला होता
अभय तूं तिला द्यायाचें होतें
चिर जीवन सुखशांतीचें
तिच्या डोळीं आसूं पुसून हासूं
तूंच उमलं द्यायाचें होतें !

उभयनिर्धारें धीर धरूनी
करायचा होता संभाळ तिचा
तोल तुझा जातां तिचाही तोल
जाईल हें तूंच जाणाया होतें !
भोंवतालच्या तुफानांतूनी
खवळल्या दर्यांतील खडक
टाळून, तुवां शांतपणानें
धीराची पराकाष्टा करून
कधीं युक्तीनें, कधीं हट्टानें
केव्हां शांतपणें, केव्हां साहसें
बेफामपणें आणि धडाडीनें
पौरुष पराक्रम करून
आणि काळजी सदा ठेवून
विश्वास–सुकाणूं दृढ धरून
ध्रुवताऱ्यावरी दृष्टि देऊन
उभय जीवांची छोटीशी नौका
तूंच तीरावर न्यायाची होती !
तुझ्यासंगें सारा जीवनानंद
घेण्याची तिची इच्छा होती ना ?
तूंच द्यायचा तिला होता ना ?

–पण तूं तिला मृत्युकाळोखीं
लोटलेंस सर्वें, अजाण जीवा !

अहह ! तुला पाहवलें कसें
कल्पनेंत तरी तिचें ते डोळे
हांसरे नाचरे, जीव ओतती जे
प्रेमभरानें डोळ्यांत तुझ्या
मिटले सदाचे अथांग जलीं
तुझ्या छातीवरी !
आणि तो श्वास, ज्याच्या मंद वासें
भारून टाकिलें तुझ्या जिवाला
शेवटच्या त्या धडपडींत
अखेरी सदाचा बंद झालेला ! !
हृदयांत ज्या प्रेम भरावें
तेथें थंड गार जल भरलें !
( शब्दांतच हें चित्र रेखतां
गहिंवर ये माझ्या हृदयीं
कल्पना विलास दुष्ट पुरे हा ! )

करुण चित्राची पाहा बरें ह्या
जगतांतल्या कष्टांदुःखांशीं
त्रासांसंकटांशीं, छळांजाचांशीं
विरोधकांच्या तीव्र विरोधाशीं
तुलना करूनी ?
सारें हें कवडीमोल आहे ना
तुझ्या प्रियेच्या जीवनापुढें ?
पटतें हें तुला थोडासा जरीं
काळ्या ढगाच्या सोनेरी कडा
आठवून मनीं आशावादानें
विचार तुवां असता केला
अजाण पोरा ! पाहा आतां कसा
सत्यानाश झाला सर्वस्वाचाच !

—आणि वेडे पोरी ! तुला वाटलें
सर्वस्व त्याच्याच हातांत होतें ?
केलें आत्मार्पण झालें प्रेमदान
सारेंच देऊन मोकळी झालें ?
नाहीं, नाहीं बरें ! तुझ्यावरही
जीवनाचा भार त्याचाही होता

तुझा वीर जरी, तुझ्या वयाचाच पोर तो होता
यौवनसहज उच्छृंखलता
आणि अधीरता त्याच्या मनाची
सारेंच त्याला साजेसें होतें !
तेथें होती तुझी खरी परीक्षा
तेथें होतें खरें कार्य स्त्रियांचें
नारीसहज मृदु भावांचें !
शांतविण्याची त्याच्या मनाला
जादू तुझ्या गोड शब्दांत होती
त्याला विश्वास तूं द्यायाचा होता
"दुःख भोगून, कष्ट साहून
एकनिष्ठा, आशा ढळूं न देतां
वैराला प्रेमानें जिंकून टाकूं
दाखवूं स्वरूप खऱ्या प्रेमाचें"
असें गोड शब्दें त्याला सांगून
पटवून त्याला द्यायाचें होतें
राहून निश्चल तुझ्या विश्वासीं
सहज तो दुःखा साहूं शकता

एकामेकांचें प्रेम पटतां
जिवा–जिवाची गांठ पडतां
संकटाची आहे काय बिशाद ?
आणि काय दुःख थोड्या विरहाचें ?
" थांब जरा थोडें, तुझीच ना मी ?
धीर धरीं सख्या, शक्ति येऊं दे
तुझ्या माझ्या पंखीं ; मग आपण
उडून आपल्या घरांत जाऊं
तेथें आनंदांत सदैव राहूं
तोंवरी बरें येथेंच राहणें
दुःख, कष्ट आणि विरह साहणें
कधीं न सोडणें परी निश्चय "
गोड युक्तिवाद असा थोडासा
असता सुचला तुजला जरी
सदाचेंच होतें सुख तुझें-त्याचें !...

झालें अखेरी कांहींच्या कांहीं
तूंही अजाण, अजाण तोही
आतां काय सांगूं ज्ञान तुम्हांला
प्रेम एक गोष्ट, विवाह दुजी

हृदयाचें नातें आहेच प्रेम
विवाह आहे जगाचें नातें
तेथें जगताचा विचार आला
जगतास नको तुम्हांस भिणें
त्यांच्यासाठीं नको त्यागाया जिणें
परी युक्तीनें समजाविणें
कां कीं, जगांतील म्हातारीं पोरें
आई बाप ज्यांना तुम्ही म्हणतां
आहेत माणसें तुम्हांसारखीं!
जन्मून वेगळ्या परिस्थितींत
वेगळे संस्कार त्यांचे होऊन
गैरसमजांचीं पुटें चढून
गंजून गेलेलीं तयांचीं मनें
आहेत अखेरी माणसांचींच!
वाटे खेळ त्यांना जीव तुमचा
कारण तो खेळ खेळत आले!
त्यांना दाखवावें तुमचें मन
कसें कणखर पोलाद आहे
त्यांना दाखवावें तुम्हीं हृदय
किती एकनिष्ठ, बावनकशी

सोन्याचें आहे!
तुमच्या दुःखें वितळेल मन
त्यांचें, जसें बर्फ वितळूं लागे
प्रखर सूर्याची लागतां जरा थोडीशी आंच
कशाला बरें मृत्यूची घाई ?
मृत्यु येणारच तुम्हां आम्हांही
पण येवो तो आपुल्या मार्गें
योग्य प्रसंगीं, योग्य कार्यांत!
वेड्यांनो! भुललां तर नाहीं ना
कवि कल्पनांना, स्वर्गा बिर्गाला ?
कल्पनाच त्या, कल्पनेंतच आहेत रम्य!
स्वर्ग असो नसो, येथेंच आहे
येथेंच प्रकाशलेल्या या जगीं
प्रेमाची गोडी, आत्म्याचीं सुखें,
देहसुखेंही!
साऱ्यांतच आहे जीवनानन्द
तसा इतरत्र कोठेंही नाहीं!

कां रे कंटाळलां जगतास या
प्रकाश पहिला जेथें पाहिला

जेथें रांगलां, दुडदुडलां
आणि वाढलां
जेथील सौंदर्य आणि आकाश
पाहून हृदय विकास झाला
प्रेमसुख जेथें तुम्हां मिळालें ?
असेल जगांत बरें वाईट
म्हणत मी नाहीं सारें चांगलें
बरें तें वाढवा, वाईट घालवा
पण जगांतच योग्य राहाणें
जगतांतच जीवन आहे, जीवनांतच आहे आनंद
येथें जगांतच जीवनानंद !

पाहा बरें जरा, चारी बाजूला
जीवनार्थ धडपड चालली
निव्वळ जीवन आनंद वाटे
असे आहेत किती जगतीं ?
उत्तरध्रुवाच्या प्रदेशीं पाहा
अर्ध्या वर्षाची रात्र असते
काळ्याकुट्ट त्या अंधारांतच
हिमवर्षाव !

चराचरहि गोठून जातें
वाहातो तशांत तुफानवारा
नाहीं निवारा
पिके न कांहीं
तेथेंही नांदती मनुष्यप्राणी
—आणखी, सुखानें !
इतुका आनंद जीवनीं आहे !

दूर कशाला ? उभे राहा जरा
पुतळीघराच्या मोठ्या दाराशीं
जेव्हां सुट्टी होते, तेव्हां नीट पाहा
एकेक कशीं माणसें येती
थकली भागली पाहा ती बाई
दहा तास पुरे काम करूनीं
बाहेर येते खिन्न मुखानें
खिन्नतेंत आहे मुग्धपणें त्या
मळूल चेहेऱ्यावरतीं हांसें
तिच्या घरीं आहे बाळ तान्हुलें
भेटेल आतां घरीं जातांच
उल्हास तोच चमके मुखीं

त्याच्यासाठींच कष्ट करतां
कष्टांदुःखांतच जीव धरतां
जीवनाचा हेतु तिजसी आहे
अशा कष्टांतही जगतसे ती
जणू निश्चयेंच सुखी होण्याच्या
इतुक्या विरुद्ध परिस्थितींत
आपुल्या जीवास फार जपते
इतुका आनंद जीवनीं आहे !

ल्हानसें तें फुलपांखरूं
पडून राहातें कोशामध्येंच
अंधारांतच जीव कंठितें, कष्ट भोगतें
वाट पाहात सान पंखांची
इतुका आनंद जीवनीं आहे !

कसा वसंताच्या वावटळींत
शुष्क वाळला पाला पाचोळा
नाचतो, फिरतो, गिरगिरतो
प्रेम-फुगडीचे फेर धरतो

उंच उंच जातां डोलूं लागतो
इतुकें जीवन प्रेमांत आहे !
इतुका आनंद जीवनीं आहे ! !

प्रेमानंद आणि जीवनानंद सोडोनि असा
मृत्युसुखीं तुम्हीं घेतली उडी !
प्रीतीचें वैभव तुम्हांस होतें
किती आनंद जीवनीं होता !
सारेंच होतें, सर्वस्व होतें !
'जीवनानें त्या एकादिलाच्या
लढा जगताच्या विषमतेशीं'
हाच संदेश तुम्हांस होता !

प्रणयी जीवांनो ! गेल्यावर जीव
ऐकवितों तुम्हां निष्फळ बोल
आहेत कारण अनुभवाचे
माझ्या प्रतीतीचे !
कारण नाहीं मी प्रीतिशाहीर
प्रीतीचें रडगाणें गाणारा

शाहीर आहें मी तेजस्वी गाणें
गाणारा, प्रीतीच्या आशावादाचा !

पेरीना ! चमन !
कशासाठीं बरें असे दिले तुम्हीं आपुले प्राण !
गेलांत सोडून जगतास या
कोठें अंधारांत ?
तेथून तुम्हां कोणीही परत आणूं न शके !
मंत्र सारे तेथें पडती फिके !
आणि माझें गाणें आशावादाचें ! !
हळहळूनी अश्रु टाकतों
तुमच्या विभक्त समाधीवरी
" हाय हाय ! ज्या एकदा गेल्या कळ्या मिटल्या
पुन्हा कां कधीं जगीं फुलल्या ! ! "

# सुप्त ज्वालामुखी

दुनियेंतल्या भाग्यवंतांनो
लक्ष्मीपुत्रांनो, सत्ताधीशांनो
तत्त्वज्ञानी आणि लेखक कवींनो
लोकनायकांनो ! येथे थांबा जरा

संध्याकाळचे हवा खाण्यास
गाडीघोड्यांतून अथवा पायीं
फिरायास जातां ह्याच रस्त्यानें
नाकास पदर खुशाल लावा
पण नका करूं डोळेही बंद !

आहेच पाहीली येथील वस्ती
येथील झोपड्या येथील लोक
असेल कधीं विचारही केला
गलिच्छतेंत कसे राहाती, कसे जगती
स्वतांचें कसें पोट भरती
आणि पोरें बाळें कशीं पोशीती
वाटली असेल तेव्हां करुणा
दया आणखी सहानुभूती
हृदय हाललें असेल थोडें !

घरीं पोचतां सुखें समाधानें
समजाविलें असेल स्वतांला
आहेच चाललें आमचें कार्य
ग्रामोद्धाराचें लोकशिक्षणाचें
सुधारण्याचें सर्व तऱ्हेनीं,
आणि हळहळ करीतच आहों
प्रगति ह्यांची सर्व बाजूंनीं
देतोंच आहोंत सर्व मदत
कोणी पैशाची, कोणी कार्याची,
कोणी कशाची
आहे शक्य ज्यास त्या त्या प्रकारें !

अरे ! अरे ! पण मुळांतच हें चुकतें सारें
वर वर बरें जरी दिसतें
म्हणून म्हणतों थांबा येथें जरा !

कडेच्याच ह्या झोंपडीपाशीं
आहे बाई उभी, पाठीशीं पोर
चार महिन्यांचें बांधलें दिसे,

पुढें उभी आहे मुलगी तिची
सहा वर्षांची
धुळीत खेळती मधलीं दोन
घरांत आहे फणफणला
घरधनी तिचा हिंवतापानें
होता चांगला धडधाकट
खेड्यांतलाच पिंड वाढला
येऊन राहिला शहरांत पण
पोटासाठीं आणि खंगून गेला !

सुखी हें कुटुंब मुळांत होतें शेतकऱ्यांचें
होतीं त्यांचींही दोन वावरें
स्वतांचें घर
सालोसाल पण नापिकी होता
कर्ज वाढलें सारेंच गेलें
शेतकऱ्याचा मजूर झाला
शहरांत काम शोधूं लागला
पण मिळणें आहे का सोपें ?
जंगलांत जाई विळा घेऊन
गवताचा मोठा भारा आणून
विकून मिळवी अर्धी भाकरी !

अशांतच झाला त्याला आजार
त्याची बाईल त्याची मुलगी
कसें बसें तेंच काम करूनी
दोन चार आणे मिळवितात
आणतात दाणादुणा घराला
नाहींत करीत कोणी याचना !

सांगा बरें ह्यांना काय पाहिजे
तुमची दया ? आणि करुणा
नको तयांना दया करुणा
दया कोणास ? दुबळ्यासाठीं अपंगासाठीं !
करी मानवांना मानहीन जो
असा दयाधर्म काय कामाचा !

आहेत हे सारे धडधाकट
नाहींत आळशी परी कष्टाळू
तुम्ही उपकार कराया येतां
अपकार मात्र त्यांना करतां !
आपलींच मनें शोधून पाहा

उपकार तुम्ही ज्यास म्हणतां
तुमचाच आहे बडेजाव तो !
त्यांच्यापासूनच घेतलें द्रव्य
थोडेंसें त्यांतलें तयांस देतां
पुन्हा दडपण्या त्यांना ओझ्याखालीं !

अरे ! जी तुम्ही ही स्थिति निर्मीली
मुळांतच ती आहे चुकली
जेथें माणसा काम न मिळे
काम करतांही पोटापुरतें मिळे न मोल
आहे तो समाज मतलब्यांचा
परपुष्टांचा नफेबाजांचा !
रक्तशोषक जळवांचाच !

एकदोन नाहीं हजारों लाख
आहेत माणसें अशीं भुकेलीं अशीं गांजलीं
त्यांचाच आहे जनसमुदाय
प्रचंड पर्वत—!
तुम्ही आहां हिरवळ वरची

फुलझाडें, बहरलेले वृक्ष !
वाटतें तुम्हांस छाया करतों, शोभा आणतों
आपणच त्या पर्वतालागीं—!
पण पाहा आतां होऊं लागले
धरणीकंप
येऊं लागले दुरून ध्वनी
पृथ्वीच्या अथांग उदरांतुनी
उकळत आहे आंत तप्तरस !
वरतीं सुंदर फुललेल्यांनो
ध्यानांत ठेवा ! आहे खालतीं
सुप्त ज्वालामुखी ! !

माझ्या त्या अपुऱ्या कादंबरीचीं
लिहिलेलीं पानें जाळून टाक
कशाला आहेस ठेविलींस तीं
नीट सांभाळून ?
वाटते का तुला परतेन मी
पुन्हा त्यांच्याकडे
आणि कधीं काळीं पूर्ण करीन
एकावेळीं तुला सांगितलेलें
कथानक तें ?

छे—नाहीं—नाहीं—
परतावयाची गोष्टच नको
वाहात्या धावत्या सळसळत्या
जीवनप्रवाहीं आपण दोघें
कितीतरी दूर वाहून आलों !
आतां तीं पानें
लिहिलेलीं सायासानें त्या वेळीं
वाचवणारही नाहींत मला
घालीन मी खालीं लाजेनें मान
छे—! माझें मन

कधींच नव्हतें तशा कृतींत
बरें झालें तूं काढिली नाहींस
कधीं आठवण —!!

हीं माझीं चित्रें!
दुबळीं अपुरीं रेघाटलेली
कशाला ठेविली आहेत तुवां
सुबक सुंदर चौकटीमध्यें
बसवून आणि ऐटींत टांगून
भिंतीवरती!
आहे जरी त्यांना आधार तुझ्या
भोळ्या कौतुकाचा आपुलकीचा
निस्सीम प्रेमाचा माझ्यावरल्या
काढून टाक ना पण तीं आतां!
ठेव कोठेंतरी कोन्याकोपऱ्यांत
नकोत सदा तीं दृष्टीसमोर
पाहावत तीं नाहींत आतां
आणि वाटते कितीदां तरी
उलटीं करून ठेवावीं सारीं
छे—! माझा हात

कधींच कुशल नव्हता त्यांत
छानच झालें ह्या धडपडींत
वेळहि नाहीं ती करावयाला
व्यर्थ यातायात ! !

पण माझ्या त्या साऱ्या कविता
पुऱ्या, अपुऱ्या आणि अधुऱ्या
कांहीं दोनचार शब्दच आणिक
उद्गारचिन्हें—! !
ठेव बरें त्या
अशाच नीट सांभाळून सदा
आहे त्यांत माझें हृदय तसें
जिवंत आणिक धडधडत
स्फुंदत स्पंदत
हासत नाचत गिरक्या घेत
आंदोलत आणि हिंदकाळत
विकासत नित्य—!

दाखवीत रहा फिरफिरूनी
मला त्या कविता आणिक गीतें

आहेत ते दुवे
माझ्या भावनांचे, भावजीवनाचे
एकेक आहे तो जिवंत क्षण
ऊन रक्तानें अनुभवलेला
तळमळून
आणि त्यातल्या निराशांनीहि
दाखविल्या मला आहेत दिशा
उजळलेल्या !
अजूनी न माझा रोमांच त्यांतील
ओसरलेला !
तीच आहे माझी आजीव सेवा
जीवनाची आणि मानवतेची ! !

## भग्नमूर्तीचें पुनर्दर्शन

मध्यें गेलेल्या सात वर्षांत
सफेदीचीं पुटें चुन्याचीं सात
चढलीं आहेत मंदिरावरी
रामलक्ष्मणाच्या
सफाईनें आणि फिरला आहे
उपद्रवी हात कोणाचा तरी
केवढा काढला आहे चिपोरा
उरलेल्या त्या एका पायाचा
भग्नमूर्तीच्या !

तेंच औदासीन्य !
भकास जीवन तेंच कळानष्ट
तशींच मेलेलीं मलिन मनें
मध्यें गेलेल्या सात वर्षांत
चढलीं आहेत त्यांवरतीहि
आणखी पुटें तशींच सात
अज्ञानाचीं आणि अंधकाराचीं
निराशेचीं आणि गांजणुकीचीं
दुबळेपणाच्या दरिद्रतेचीं
सूकरसमान समाधानाचीं

नों. दि.
... ालय

हीन स्वार्थाचीं, दांभिकतेचीं
किंकर्तव्यमूढ
पराजयगामी मनोवृत्तीचीं !

अरेरे ! ह्याच सात वर्षांत
उलाढाली झाल्या जगांत किती
नवशक्ति किती उफाळून आल्या
कितीतरी गेलीं जळून खाक
मेलेलीं मढीं
पुढील घडण घातली गेली ! !
आम्ही मात्र देत आहोंत तींच
सफेदीचीं आणि अंधकाराचीं
वार्षिक पुटें !

सुटणार आहे झंजावात तो
एकदाचा कधी
हालवील जो हें स्तब्ध जीवन
उसळवीत प्रचंड लाटा ?
झालें नाहीं जें मध्यें गेलेल्या
सात वर्षांत
होणार आहे का पुढें येणाऱ्या ?

# काम आणि आराम

असंख्य फुलें
डोलत आहेत उषःप्रभेंचीं
झुळझुळणाऱ्या तरल वायूच्या लहरीवरीं
निळा रंग त्यांचा
तसेंच वरती निळें आकाश
प्रसन्न प्रभात
नभांत—मनांत

ओसरल्या आतां हस्ताच्या सरी
ते काळे ढग—भेसूर वादळें—
आणि ते विजांचे कडकडाट—
गंभीर गर्जना—
पावसाच्या झडी—अंधारल्या दिशा—
संपलें सारें
त्यांतूनच आली पुन्हा ही उषा......
आनंद...आल्हाद... !

निसर्गसौंदर्य—
विभवसंपदा मानवजातीची—

हा शांतरस–जीवनरस—
मानवासाठीं
निश्चिंत घ्यावया अखंड आस्वाद......
चाखतो पण तो जरा न कुठें
सुखभरानें भारावून डोळे
तोंच हो त्याचें मन विन्मुख
अस्थिर अधीर...
वाहूं लागतो किंचित् वेगानें
रुधिर प्रवाह......
तीं त्याचीं कामें......!
हीं आणि तीं—ते वाढते ढीग—
ते व्याप व्यापार—
अपरंपार......

छे–छे–निसर्गा
नाहीं वेळ त्याला
पाहाया तुझ्या ह्या अनंत लीला
हा तुझा खेळ
आहे मात्र त्याचा वेळ घेणारा
धावपळ त्याची अखंड चालू

ह्या जन्मीं नाहीं—
निदान आता—
रिकामपणाची सोबत तुझी—!
आधीं त्याचें काम...नंतर आराम!!

आणि त्याचीं कामें
आतां न राहिलीं आहेत त्याचीं
त्याच्या जीवनाचीं—
जीवनहि आहे त्याचें कुठें आतां ?
त्यानेंच निर्माण केलेलीं भुतें
करून घ्यायाला आपलें काम
त्यालाच आहेत राबवीत नित्य
गुलामापरी
रात्रंदिन आणि अर्ध्यापोटींहि !

पाहा हीं कामें—त्याचीं—मानवाचीं...
निसर्गा तुझ्याशीं झुंज देऊन
विजय पाहा हे मिळविले त्यानें
पाहिलेस का ते हजारो मजूर—

मानवच बरें—
रात्रीचा दिवस करून बिचारे
बांधीत आहेत प्रचंड नौका
तुझ्या ढगांचा गडगडाटहि
विरून जाईल एवढा प्रचंड घणघणाट
चाललेला आहे वर्षभर येथें...
आतां ही नौका
शिरणार तुझ्या अथांग सागरीं
कितीहि जरी तूं उसळविलें
बेफाम तुफान
तेंहि न शकेल बुडवूं तिला
ती शक्ति नाहींच तुझ्यांत आतां
तेंहि आहे कार्य मानवांचेंच
कुशलतेचें !
पाहा ते शास्त्रज्ञ–ते थोडे लोक—
ते कारागीर–किती काळजीनें
घडवीत तो आहेत तेथें
पाणसुरुंग
पेरूनी देतील त्यालाहि तेच
त्याच सागरांत

आणि त्याचा होता जरा कुठें स्पर्श
उडेल धडाका
प्रचंड नौका ती जाईल क्षणांत
रसातळाला !

हासत असेल निसर्ग तेव्हां
उपहासानें
पाहून हीं सारीं कामें मानवांचीं
सहस्रांचें तें अहोरात्र कार्य
एका वर्षाचें—
एकाच क्षणांत
चक्काचूर त्याचा करणारें तें
दुसरें कार्यहि थोड्या लोकांचें !
इकडे जीवास वांचवावया
कुशल त्याचे धन्वंतरी, वैद्य
औषधें, गोळ्या...
तिकडे तेच जीव घ्यायाला
त्याहून कुशल शास्त्र–कारागीर
तोफा आणि गोळे......
..........................

म्हणत असेल.........
.........उपद्व्याप हे
ह्यांच्याचसाठीं कां मानवालागी
ते दोन हात
एक जोडाया...एक मोडाया ?
दोन्हीहि आहेत करीत काम !
मिळेल कसा ह्यांना आराम !!

अन्याय घडो कोठेंही
चिडून उठूं आम्ही
घाव पडो कोठेंही
तडफडूं आम्ही
हाल पाहून हळहळूं
होवोत कोठेंही
पिळणूक पाडील पीळ आम्हां
असो कोणाचीही
वजन आमच्या छातीवर
पायांतल्या बेड्यांचे दासांच्या
वळ पाठीवर आमच्या
चाबूक उडो कोठेंही
अवघ्या अभाग्यांचे अश्रू
उभे आमच्या डोळ्यांत
दुःखितांच्या वेदनांच्या
कळा उरांत आमच्याही
संवेदना साऱ्या जगाची
हृदयांत आहे भरभरून
नातें नवीन असें कांहीं
जोडून आहोंत आम्ही
मानव तेही मानव आम्ही !

# विजय होतां

विजय होतां
थांबल्या गोष्टी नव्या जगाच्या
साद झाले बंद
पडसादहि विरून गेले

शून्य पोकळींत निर्वात प्रदेशीं
आशाळभुतांच्या आशांच्या भोंतीं
नाचूं लागलीं पुनश्च भुतें
अकाळ विकाळ तशींच तींच

विजय होतां
धावूं लागले सिंहासनाकडे
घायाळ राजे
पळूं लागला पांढरा व्यापार
प्रथम गाठाया बाजार पेठा
शोधूं लागले गुलामांचे धनी
दास आपले
बंदिशाळांचे कारागीर आले
उभारावयाला कोसळलेल्या
दगडी भिंती
घडवूं लागले लोहार पुन्हा

त्याच शृंखला
हाकून दिलेलीं मस्तवाल कुत्रीं
परतलीं पुन्हा वांती शोधीत

विजय होतां
समतेच्या आणा घेत घेत जे
रक्त आणि घाम मागत होते
विसरले ते त्या रक्ताचीं ऋणें
जमले गिधाडासारखें पुन्हा
उरल्या मांसाचे लचके घ्याया

विजय होतां
मनांत राहिलीं मनोगतें सारीं
मानवतेचीं
विरलीं जागच्या जागींच स्वप्नें
चिरशांततेचीं !

## धडकी

दूर नाहीं पावसाळा आतां
उत्कंठित मन झालें माझें
कसलीसी हुरहुरहि
लागून राहे
नाहीं ' अन्यथावृत्ति ' ती
मेघालोकाची

सुचवीत ' सावनके दिन आये '
धडधडत नाहीं हृदय माझें आज
साज कल्पून वर्षेच्या अभिसाराचा
चुकणार तर नाहीं ना येण्यास
ही चंचल वर्षा ?
शंका येऊन
धडकी भरे !

आलीच नाहीं जर वर्षा ती
उधळीत हर्षाला
असेंच राहिलें हें निळें आकाश
खेळवीत सावकाश

जर पांढऱ्या ढगांना
तसाच राहिला वाहत जोराचा
गार गार वारा
पळवीत पार पार
आल्या आभाळास
रोहिणीवर आरोहण नच झालें
जलदांचें
मृग झाला वंचित जर
मृगजळानें
आर्द्रा करीत गेली
सार्द्र मात्र नयनांस
पुनर्वसु न वरसून
पुष्य हुश्श करून सुस्कारला
आश्लेषा कंठाश्लेषाचीं
निसटली देत आश्वासनेंच
मघा पुढें बघा म्हणाली
आणि पूर्वा दुर्वाहि
झाली वाळविती
उत्तरा निरुत्तर बसून
हस्त भलतीकडेच

मस्त होऊन उधळला
चित्रेनें धरिलें वर
भयानक विचित्र रूप
स्वातीनें वाती दिल्या हातीं
सत्ताविसांतून जाऊन नऊ
शून्यच राहिलें बाकी
तर—?
चिंता जडून
धडकी भरे !

हे व्ययनाम संवत्सर शकाचें
हेमलंबी–विलंबी नाम
संवत्सर संवतांचें
सार्थनाम झालें अन्
ठरलें जर फसलें वर्षच
फसलीचें
फलज्योतिष्यें निष्फळ झालीं
राजा बुध, मंत्री शनी
अग्रधान्येश मंगळ
मेघेश शुक्र, रसेश गुरू

पश्चाद्धान्येश रवि
गडगडलें जर
संवत्सराधिपांचें
मंत्रिमंडळ हें
दुहीनें आपसांतल्या
किंवा सम्राट् निसर्गानें
निर्णय लाविले फेटाळून त्यांचे
मेघानें द्रोण नांवाच्या
निवास करून वणिग्गृहांत
होऊन पंचमस्तंभी
नरेंद्र नाम नागास जर
करूं दिला विघ्नसंतोष
तर—?
हतबुद्ध होऊन
बावरून
धडकी भरे!

" काले वर्षंतु पर्जन्यः
पृथिवी सस्य शालिनी
लोकोयं क्षोभरहितः

शांतिः शांतिः शांतिः
शांतिरस्तु पुष्टिरस्तु
तुष्टिरस्तु...... ”
प्रार्थना जर झाली ही
व्यर्थ निरर्थ आमची
तर—?
केविलवाणी कींव करून
कळवळून
धडकी भरे !

•

तर—?
तर काय
घोर अवर्षण
दुष्काळ विक्राळ !
कणन् कण धान्याचा
मिळवून, मोजून, खाऊन
राहून अर्ध—नाहीं—चतकोर पोटीं
आशा धरून एकेक क्षण
कंठणारे जीवन वाट पाहत
अन्नधान्याची

पुढल्या पिकाची
मरणार बिचारे भुकेनें
तडफडून
लाखो लोक
आमचे
पाहणार आम्ही मरणारे ते
पाहावतहि नाहीं म्हणत
कण्हत, तणतणत
हळहळत
पण जेवत दोन्ही वेळ
बेशरमपणें जिवंत राहत
घृणा येऊन माझी मलाच
भीती वाटून
धडकी भरे।

करणार काय आम्ही
करून करून ?
भीक मागून परदेशीं
धान्य आणून
इकडचें पाठवून तिकडे

काढून दडवलेलें
मतलब्यांना दंडून
असे तसे वाटून देत
प्राण वाचवूं कांहीं !
राहूं पण तसेच अवलंबून
देवावर, दैवावर
लहरीवर निसर्गाच्या
जुन्या जीवघेऊ,
राज्य नीतीवर
उधळपट्टी करीन
अफाट मानवशक्तींची
स्वार्थांत, भांडणांत
लढण्यांत, मारण्यांत, मोडण्यांत
छिनून घेण्यांत
धन धान्यांना
साठविण्यांत, सडविण्यांत
जाळण्यांत
पुन्हा आणीत दुष्काळ असा !
चीड येऊनी
भणभणून
धडकी भरे !

ही हलाखी
हाल अपेष्टा ह्या
हे निष्फळ कष्ट
हीं दुःखें, हे रोग, सांथी
ह्या लढाया
दुष्काळ हे, हीं मरणें
ही बरबादी
घालविणें आहे आमच्याच हातीं
मानवांत ती शक्ति
देवाचा, दैवाचा, निसर्गाचा
उपसर्ग ना पोंचे जिथें
अशी
जगव्यवस्था
मानवा निर्माविया बुद्धि असे
सामर्थ्य त्याचें जाणवून
नेणीव पाहून तळमळून
तडफडून
धडकी भरे !

खास उद्या उठतील
हे भुके कंगाल

आणि लोक सारे
जगनिष्ठावंत
विचारावंत, नवे कलावंत
सोडून भ्रांति
करीत क्रांति
भविष्य दिसून
रोमांच स्फुरून
येत थरथरून
धडकी सरे !

आहे हृदयांत आतां
नुसतें उद्दाम बंड भरलेलें
करीत थंड उरलेले भाव
भावना मुरलेल्या

विटलों आहों पुरतेपणीं
त्याचा त्या
शृंगारवीरकरुणादि
नवरसास
रसरसून उसळवील जो
मानवतेच्या प्रक्षोभास
असा रस अखंड
स्थायीभाव विभाव अनुभाव
संचारी भाव त्याचे
अनुभवीत आहों पाखंडी

शरिरांतल्या रक्ताच्या
अणूअणूंचा
अणुस्फोटक करणाऱ्या

रसायन शास्त्राच्या साहित्याचा
आहों घेऊन ध्यास
हटविण्यास हल्ले
शत्रूचे मानवमात्राच्या
किल्ले उडविण्यास त्याचे
क्षणार्धांत अस्मानांत
धुळींत मिळविण्यास तडाक्यांत
साम्राज्यें अंधारयुगांचीं
स्थापायास अधिराज्य
समतेचें

## पेतेव्हा

व्याकुळ पृथ्वी
प्रखर उन्हांत होरपळतां
जळतांना जागोजाग वणव्यांत
नव्हती एकहि हुंदका देत
दिसूं देत अश्रू नयनांमधें
दाबीत होती आंतल्या आंत
दुःखांचे कढ
करुनी आपल्या जिवाचें पाणी
पुरवीत होती खोल मुळांना
फुटत होती तरुलतावर
नवी पालवी
फुलोर, बहर, फुलाफळांचा
गाऊं लागले बुल्बुल आणि
कोकिळहि घेऊं लागले ताना
उन्मत्त प्रीतीच्या, विरहार्ततेच्या
नवोन्मेषाच्या
वसंत...वसंत...!
... ...तूं मात्र शांत!!

तूं मात्र शांत......
दाटलेल्या कंठीं

अनुक्रम क्र. १०४
विभाग ७३८२
क्रमांक
नोंद दि. २४।८।५४
ग्रंथालय

आटले होते जणूं तुझे शब्द
वाढत होती तळमळ पण
हृदयामधें
नव्हतें संगीत सळसळत—
व्याकूळ पृथ्वी
प्रखर उन्हांत होरपळत !
......तूं मात्र शांत !!

वसंत सरे, मोहर गळे
बिलगून फळें फांद्याफांद्यांना
वाढत होतीं, पक्व होत होतीं
कितीक गळून पडत होतीं
वाहतां थोडेसे वादळी वारे
कोकिळाच्या गोड गीतांत आतां
भरलेली होती किती आर्तता —!
वाट पाहात वेळ येण्याची
हृदयांत पण हळहळत
तूं मात्र शांत.........!!

......तूं मात्र शांत
पृथ्वीचाहि होता ताप वाढत
आसावलेल्या जीवांना भास
मृगजळाचेहि भुलवीत होते
वाऱ्याचा वाढत होता पण जोर
फडफड होत तुझ्या पंखांची
दूरचीं क्षितिजें न्याहाळून तेव्हां
पाहून आलास वादळाच्या खुणा
आतुरपणें
तरीहि नव्हता फुटत शब्द
तूं मात्र शांत......!

घोंघावत होता रात्रभर वारा
दिवसा धुळीचे लोट, वावटळी
उठवीत होता
कडाडत होते जीर्ण वृक्ष आणि
मोडून पडत होत्या कितीतरी
कोवळ्या फांद्या
आणि संध्याकाळ होण्यापूर्वींच
क्षितिजाच्या कडा आक्रमीत होते

ग्रं. क्र. ६७९३

काळे निळे मेघ
आणीत होता ओढून त्यांना
सोसाट्याचा वारा......
तुफान...वादळ...
आदळत ढग ढगावरती
व्यापीत आकाश
पृथ्वीच्या जवळ जवळ आले
अंधार भरे......
क्षणभर होई सारें निस्तब्ध !
आणि ओठावर आले तुझे शब्द ! !

चकाकली वीज
गंभीर घुमली घनगर्जना
निनादले तिचे साद पडसाद
सुरू झाली वृष्टी
मृगाचा पाऊस बरसूं लागे
थरारे सृष्टी !

कडाडूं लागल्या विजावर विजा
सरीवर सरी वर्षत गर्जत

वादळांत आणि कल्लोळांत त्या
आसरा निवारा सोडून देत
उडालास तूं भराऱ्या घेत
बेफामपणें
मेघामध्यें वर
परत खालती माळरानावर
पुन्हा वर खालीं नव्याभूमीवर
नांगरलेल्या
आणि विजांच्या लखलखाटांत
मेघांच्या गंभीर गडगडाटांत
फुटे तुला शब्द—

" भिऊ भिऊ भिऊ
नका भिऊ भिऊ
उठारे उठारे सत्वर सत्वर
तत्पर तत्पर
पेरा पेरा पेरा
नव बीजें पेरा
नव्या आशा धरा
पेर् ते व्हा ! पेर् ते व्हा ! ! "

वादळ ओसरे तरीहि स्फुरे
तेंच आर्त गीत !
माळरानावर
नांगरलेल्या नव्या भूमीवर
घिरट्या घालीत भराऱ्या घेत
ओतीत जासी तूं कळकळीच्या
भावपूर्ण स्वरें
तेच शब्द आणि त्याच लकेरी
त्याच गीताच्या
पेर् ते व्हा ! पेर्तेंव्हा ! !

## प रि च य

आत्माराम रावजी देशपांडे ‘अनिल’
जन्म, ११ सेप्टेंबर १९०१

### प्र का शि त   सा हि त्य

फुलवात, १९३२: १९२० ते १९३१ मध्यें लिहिलेल्या भावगीतांचा संग्रह

भग्नमूर्ति, १९४०: १९३५ मध्यें लिहिलेलें दीर्घ काव्य

निर्वासित चिनी मुलास, १९४३: मार्च १९४२ मध्यें लिहिलेलें दीर्घ काव्य

# टिपणें

अनुक्रमानुसार पहिल्यानें कवितेचें नांव दिलें असून नंतर वृत्त, जाति अथवा छंद दर्शविला आहे. शक्य तेथें पटवर्धनांच्या छंदोरचनेंतील नांव दिलें आहे. विसंगत चाली लावल्या जाऊं नयेत म्हणून कांहीं कविता लिहितांना मनांत असलेली स्वर-योजना, राग व ताल देऊन सूचित केली आहे. अवश्य तेथें शब्दावरील टीपा व शेवटीं रचनेचें स्थल व काल दिला आहे. कंसांतील निर्देश मूळ कल्पनेच्या आणि अपूर्ण रचनेच्या स्थळ-कालाचा आहे.

## उद्या

वृत्त पंचचामर, कलिंदनंदिनी.
राग यमनकल्याण, ताल दादरा.
नागपूर, डिसेंबर १९४३.

## पहिला पाऊस

अक्षर छंद परिलीना.
राग मल्हार, ताल दादरा.
वर्धा, मे १९३८.

## पहाट

अक्षरछंद देवद्वार, अभंग.
आर्वी, फेब्रुआरी १९४०.

## झळ

जाति भूपति पण बांधणी निराळी.
मात्रामापन करतांना उच्चारांतील
प्रसरणसंकोचन ध्यानांत घ्यावें.
'वाट' कवितेवरची टीप पाहावी.
राग यमन, ताळ धुमाळी.
नागपूर-वर्धा, एप्रिल १९३८.

## प्रीतीची रीत

हरावर्तनी जातीचा एक प्रकार.
राग भैरव, ताल खेमटा.
नागपूर, ऑक्टोबर १९४०.

## फुलचिमणी

जाति हरिभगिनी वा स्वर्गंगा. फुलचिमणी किंवा फुलसुंगणी ही अतिलहान आकाराची आणि विविध आकर्षक रंगाची चिमणी आहे. तिचें इंग्रजी नांव सन्बर्ड् आहे.
सूर हा शब्द उडी मारण्याचा प्रकार 'डाइव्ह्' ह्या अर्थी योजिलेला आहे.
रामटेक, नोव्हेंबर १९४४ ( उमरावती, १९२६ )

झाला अंधार बाहेर

अक्षरछंद, ८ × ३ + ६.
राग पूर्वी, ताल दीपचंदी.
पुणें–नगर, जून १९३४.

हांक

जाति व अक्षरछंद ह्यांचें मिश्रण.
ओळी १, ६, १२, १९, जाति धवलचंद्रिका,
भृ । भृ । भृ । +; ओळी ११, १७, १८, जाति धवलचंद्रिकाच,
पण, भृ । भृ । भृ । ⏑ +
इतर ओळी ५ + ५ ह्या निर्झरगीत अक्षरछंदाच्या.
नागपूर, ऑक्टोबर १९३२.

धुंवारी

अक्षरछंद देवद्वार, अभंग. धुंवारी म्हणजे जोराचा पाऊस पडत असतांना दिसणारें जलकणांचें धुकें. धुंवारी दाटलेली दिसली म्हणजे आणखी जोराचा पाऊस येणार असें समजतात.
हिंगणघाट, ऑगस्ट १९३७.

चित्तचकोर

जाति पादाकुलक.
राग पटदीप, ताल त्रिताल, ठाय.
रामटेक, डिसेंबर १९४४. ( पुणें, १९२३ )

पावसाळा

अक्षरछंद, ग्रांथिक ओवी.
राग देस, ताल त्रिताल अध्धा.
नागपूर, ऑगस्ट १९३२. ( उमरावती, १९२६ )

घराकडे जातां

अक्षरछंद शुद्धसती.
नागपूर, जून १९३४.

तीच बांसरी

जाति विजया.
नागपूर, मार्च १९३२.

शर्वरिणी

जाति मदनरंग. शर्वरिणी = इंग्रजी सेरेनेडसारखें गीत.
नागपूर, डिसेंबर १९३७.

गीतप्रवाह

वृत्त मंदाक्रांता. अनुहतनाद किंवा अनुहद नाद हे शब्द अनाहतनाद ह्या अर्थी संतवाङ्मयांत योजिलेले आहेत.
नागपूर, ऑगस्ट १९४५. ( उमरावती, १९२४ )

परावृत्ति

जाति नववधू पण अंतरा वगळून. आर्वी, जानेवारी १९४०.

### प्रीति तुझी माझी

अक्षरछंद. पहिल्या १२ ओळीच्या ६ ओळी धरायच्या. त्या १४ अक्षरी लवंगलता छंदाच्या आहेत. नंतरच्या ४ म्हणजे २ ओळी, १५ अक्षरी हरिभागिनी छंदाच्या आहेत. शेवटल्या ४ म्हणजे २ ओळी पुन्हा लवंगलता छंदाच्या आहेत. राग बिंद्रावनी सारंग, ताल केरवा. रामटेक, डिसेंबर १९४४.

### प्रभात तारा

जाति मन्मथ सुंदर, पहिलीं दोन कडवीं.
जाति वनहरिणी, तिसरें कडवें.
गणदेवी, मे १९४५. ( उमरावती, १९२४ )

### आरास

जाति पादाकुलक व दोहा, मिश्र.
१, ६ ते ९, १४ ते १८ ह्या ओळी पादाकुलक जातीच्या.
इतर अंतऱ्याच्या ओळी दोह्याच्या.
भैरवींतली कव्वाली.
गणदेवी, मे १९४५. ( उमरावती, जुलै १९२७ )

चिरयौवन

वृत्त पंचचामर, कालिंदनंदिनी.
आकोला, नोव्हेंबर १९४४.

गरीब आणि पावसाळा

जाति हरिभगिनी, स्वर्गंगा.
नागपूर, ऑगस्ट १९३४.

एक

अक्षरछंद शुद्धसती, अभंग.
वाशीम, ऑक्टोबर १९४५.

तिकडेच सारें कांहीं

अक्षरछंद देवीवर, अभंग.
वाशीम, सेप्टेंबर १९४५.

शांततेचें पुनरागमन

जाति धवलचंद्रिका आणि अंतरा जीवनलहरी जातीचा.
वाशीम, ऑगस्ट १९४५.

## वाट

पद्मावर्तनी जाती. ह्या गीताच्या चालींत, ' मला, ' ' वाट, ' ' दाट, ' ' नाग, ' ' पाय, ' ' पान, ' ' साग, ' ' जरा, ' व ' घाट ' ह्या शब्दांतील गुरु अक्षरांचा संकोच आहे. त्या गुरु अक्षरांचा उच्चार लघु अक्षराच्या मात्राकालांत आहे. ह्याप्रमाणें प्रत्येक ओळ सोळा मात्रांची आहे. जुन्या मराठी गीतांत, ढंगानें वा ठसक्यानें शब्द उच्चारण्यासाठीं असा गुरु अक्षरांचा संकोच रूढ आहे.

लवण म्हणजे पावसाळ्यांत पुराच्या पाण्याचा पाट फुटतो अशी जागा. पानवसणी म्हणजे पाणी सांचून राहतें अशी दलदलीची सखोल जमीन.

उमरावती—यवतमाळ, नोव्हेंबर १९४६.

## दर्शन

छंद गजवदन ( बारा अक्षरी अभंग )

नगारची म्हणजे नगारे वाजविणारे

यवतमाळ—नागपूर, नोव्हेंबर १९४६.

## वासरूं

छंद देवीवर ( अभंग )

यवतमाळ—नागपूर, नोव्हेंबर १९४६.

श्रीज्ञानेश्वराच्या समाधीपाशीं

अक्षरछंद गजवदन, अभंग. वाशीम, डिसेंबर १९४५.

प्रेम आणि जीवन

पांच आणि सहा अक्षरांच्या चरणकांच्या स्वैर जुळणीनें सिद्ध होणारा मुक्तछंद ह्या काव्याच्या निमित्तानें पहिल्यानें सुचला. सध्या हाच मुक्तछंद रूढ झाला आहे. ह्या मुक्तछंदाच्या प्रकारास मी 'प्रेमजीवन' हें नांव सुचवितों.

पुतळीघर म्हणजे सूत कातण्याची गिरणी. पेरीना भरूचा आणि चमनलाल धवान ह्या दोघांनीं नागपूर येथील तेलंगखेडी तलावांत ता. १३–२–१९३५ रोजीं एकत्र आत्महत्या केली. रामटेक, १५–२–३५ ते १६–२–३५.

सुप्त ज्वालामुखी

मुक्तछंद प्रेमजीवन.
रामटेक, मार्च १९३५.

विशेष

मुक्तछंद प्रेमजीवन.
जळगांव, एप्रिल १९४२.

## भग्नमूर्तीचें पुनर्दर्शन

मुक्तछंद प्रेमजीवन.

'भग्नमूर्ति' हें काव्य रामटेक येथें ता. २०-६-३५ रोजीं पूर्ण झालें. त्यानंतर सात वर्षांनीं ता. २०-६-४२ रोजीं पुन्हा त्या मूर्तीचें दर्शन झालें.

रामटेक येथील प्रसिद्ध रामलक्ष्मणांचीं मंदिरें ज्या टेकडीवर आहेत त्याच टेकडीवर ही त्रिविक्रम वामनाची भग्नमूर्ति आहे.

रामटेक, २०-६-१९३५.

## काम आणि आराम

मुक्तछंद प्रेमजीवन.

उषःप्रभा म्हणजे 'मॉर्निंग' ग्लोरी नांवाची वेल.

नागपूर, ऑक्टोबर १९४२.

## मानवता

ह्या कवितेचा मुक्तछंद, प्रेमजीवन मुक्तछंदाहून निराळा आहे. चरणकांच्या दृष्टीनें त्याचें तंत्र दोन अक्षरी व तीन अक्षरी चरणकांचें आहे, परंतु वाचावयाची पद्धत उच्चारानुसारी आणि आघातप्रधान आहे. ओळींची रचना आघातांच्या आंदोलना-प्रमाणें असून, आघात शब्दोच्चारांतील आघातांशीं जुळतील असे आहेत. ह्या मुक्तछंदाच्या प्रकारास मी 'मानवता' हें नांव सुचवितों.

वाशीम, जानेवारी १९४६.

अनुक्रम
क्रमांक
नों. दि.
नालय

विजय होतां

मुक्तछंद प्रेमजीवन.
वाशीम, फेब्रुवारी १९४६.

धडकी

मुक्तछंद मानवता.

कडवें १ : 'मेघालोके भवति सुखिनोप्यन्यथावृत्ति चेतः' ह्या मेघदूतांतल्या ओळींचा येथें उल्लेख आहे.

कडवें २ : पावसाच्या नक्षत्रांचा क्रमवार उल्लेख केला आहे. 'बरसेल स्वाती तर कापसाच्या वाती' अशी जुनी म्हण वऱ्हाडांत रूढ आहे.
पावसाच्या नक्षत्रांतील नऊ नक्षत्रें वर्षाच्या सत्तावीस नक्षत्रांतून गेलीं म्हणजे शून्यच राहतें, असें उत्तर असणारा 'सत्तावीसांतून नऊ गेले शून्य राहिले' हा जुना उखाणा आहे.

कडवें ३ : पंचांगांतील संवत्सर फल असें आहे : . . .
'अथ स्वस्तिश्रीमन्नृप विक्रमार्क समयातीत गुजराती संवत् २००२ हेमलंबीनाम संवत्सरे, मारवाडीय संवत् २००३ विलंबीनाम संवत्सरे तथा च श्रीमन्नृप शालिवाहन शके १६६८ व्ययनाम संवत्सरे, या वर्षी राजा बुध, मंत्री शनी, अग्रधान्येश

( खरीपाचा स्वामी ) रवि ह्याप्रमाणें अधिपति आहेत. द्रोण नांवांचा मेघ असून त्याचा निवास वणिग्गृहांत आहे. नरेंद्र-नामा नाग आहे, इ. इ. ह्या संवत्सरफलाचा येथें उल्लेख आहे. विघ्नसंतोष हा शब्द ' साबोताज ' ह्या अर्थी वापरला आहे.
उमरावती, २३–५–१९४६.

बंड

मुक्तछंद मानवता.
उमरावती, ऑक्टोबर १९४६.

पेर्तेव्हा

मुक्तछंद प्रेमजीवन.
पेर्तेव्हा हें एका पक्ष्याचें नांव आहे. ह्या पक्ष्याचें इंग्रजी नांव कॉमन हॉक ककू किंवा ब्रेन फीव्हर बर्ड.

हिंदुस्थानांत हा पक्षी सार्वत्रिक आहे. ह्याचा आवाज पावसाळ्याच्या सुरुवातीस विशेषेंकरून ऐकूं येतो. मृगाच्या पावसांत ह्याला कंठ फुटतो अशी समजूत आहे. ह्या पक्ष्याच्या आवाजांत शेतकऱ्यांना " पेरते व्हा " हे शब्द ऐकूं येतात. ह्या पक्ष्याचा शब्द ऐकल्याशिवाय शेतकरी पेरणी धरीत नाहींत. ह्या पक्ष्याची हांक स्पष्ट असते व तो लागोपाठ पांच सहा वेळां ती हांक देत असतो. इंग्रजींत त्या हांकेवर मजेदार शब्द

वसविले आहेत. प्रस्तुत कवितेंत ' भिऊ भिऊ भिऊ '...ते... ' पेरते व्हा ' इथपर्यंत ह्या पक्ष्याच्या हांकेशीं साम्य असलेले शब्द योजिले आहेत.

ह्या पक्ष्याचें रूढ नांव ' पेर्तेव्हा ' हें आहे. ह्याच नांवानें हा पक्षी ओळखला जातो. परंतु कोंकणांत ह्याला ' पावश्या ' म्हणतात. हें नांव अर्थात् ' पेर् ते व्हा ' ह्या शब्दांवरून त्यास दिलें गेलें. शब्द दाखविण्यासाठीं ' पेर् ते व्हा ' व नांव दाखविण्यासाठीं ' पेर्तेव्हा ' अशी लेखनपद्धति ठेविली आहे.

REFBK-0006913
REFBK-0006913